लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या 'सिनेट'साठी प्रचार सुरू

## छाननी आज : विविध संघटनांचे नियोजन

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) आणि विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत शुक्रवारी संपली. त्यानंतर विद्यापीठ विकास आघाडी, शिव-शाहू आघाडीच्या उमेदवार, पदाधिकारी, सभासदांनी गटनिहाय मतदारांना भेटून प्रचाराची सुरुवात केली. या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या एकूण ५०१ उमेदवारांच्या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया आज, सोमवारी होणार आहे.

या निवडणुकीच्या मैदानात विकास आघाडी, सुटा, शिव-शाहू आघाडी, आजी-माजी विद्यार्थी कृती समितीसह काही अपक्ष उमेदवार उतरले आहेत. पदवीधरच्या १६४ जागांसह सिनेटसाठी सर्वाधिक २९०, विद्या परिषदेसाठी २७ आणि ३६ अभ्यासमंडळांच्या प्रत्येकी ३ जागांसाठी १८४ जणांचे अर्ज दाखल



झाले आहेत. माघारीसाठी मंगळवार (दि. १ नोव्हेंबर) मुदत आहे. त्यानंतर अंतिम उमेदवारांची यादी निश्चित होईल. कार्यक्षेत्रातील केंद्रांवर दि. १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. दरम्यान, विकास आघाडी, शिव-शाहू आघाडी, आजी-माजी विद्यार्थी कृती समितीने त्यांच्या उमेदवारांचा प्रचार सुरू केला आहे. सुटाच्या पदाधिकाऱ्यांनी रविवारी प्रचाराच्या नियोजनासाठी उमेदवारांची बैठक घेतली. त्यात बुधवारपासून प्रचार सुरू करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती सुटाचे प्रमुख कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील यांनी सांगितली.

पुढारी

# विद्यापीठ निवडणुकीतंर्गत आज अर्जांची छाननी

**कोल्हापूर :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकींतर्गत सोमवारी (दि. ३१) अर्जांची छाननी केली जाणार आहे. अर्ज माघारीनंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. शनिवारी प्राप्त अर्जांचे वर्गीकरण करून यादी जाहीर करण्यात आली. निवडणुकीसाठी प्राप्त अर्जांची छाननी सोमवारी (दि. ३१) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार आहे. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेण्याची मुदत आहे. त्यानंतर निश्‍चित केलेल्या मतदान केंद्रावर १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर १६ नोव्हेंबर रोजी विद्यापीठ कार्यालयात मतमोजणी होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
31 OCT 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणुकीत रंगली चुरस

## संघटनांच्या प्रचार बैठकांना जोर : विद्यापीठ परिक्षेत्रात प्रचाराची रणधुमाळी : ३९ जागांसाठी २९० अर्ज

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीत अधिसभेच्या ३९ जागांसाठी २९० अर्ज आले. विद्यापीठ स्थापनेपासून प्रथमच ३६३४३ पदवीधरांनी नावनोंदणी केली. यंदा विकास आघाडी, सुटा, शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती आणि शिव-शाहू आघाडीसह अपक्ष उमेदवार रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे यंदा अधिसभेच्या सर्वच जागा निवडून आणण्यासाठी सर्वच संघटनांमध्ये चुरस आहे. विद्यापीठ परिक्षेत्रात प्रचाराची रणधुमाळु सुरू आहे.

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीतील मतदारांची नोंदणी पाहता पदवीधर आणि अधिसभा शिक्षक मतदारसंघात चुरशीने मतदान होईल, यात शंका नाही. सध्या विकास आघाडीचे वर्चस्व असले तरी शिक्षक आणि अभ्यासमंडळावर सुटा आपले स्थान कायम ठेवले आहे. यंदाही दोन्ही संघटना आपआपल्या जागा निवडून आणतील याबद्दल शंका नाही. परंतू पदवीधरमध्ये अनेक विद्यार्थी संघटनांनी आपले उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले आहेत. त्यामुळे पदवीधर मतदारसंघात चुरस लागणार की या संघटना विकास

- **विद्यापीठ स्थापनेपासून पहिल्यांदाच ३६३४३ पदवीधरांची नावनोंदणी**

आघाडी किंवा सुटाला पाठिंबा देणार, हे अर्ज माघारीनंतरच स्पष्ट होईल. प्राचार्य, संस्थाचालक, विभागप्रमुखांसह इतर मतदार संघात विकास आघाडीचे नेतृत्व असून भविष्यात काय होईल, याकडे लक्ष लागले आहे.

उमेदवारांच्या अर्ज माघारीनंतर प्रचाराला फक्त सहा दिवसच मिळणार. यामुळे प्रचार बैठकांनी जोर धरला आहे. विकास आघाडीत कोणाला किती कोटा द्यायचा ठरले असले तरी मतदान कसे करून घ्यायचे हे मोठे आव्हान आहे. त्यामुळे तिन्ही जिल्ह्यातील आघाडीने नोंदवलेले २६ हजार मतदारांचा एकगठ्ठा अबाधित ठेवून, इतर मतदान कसे वळवायचे याचे नियोजन सुरू आहे. तर सुटाने आपला अजेंडा तयार केला असून, उमेदवारांच्या प्रचारासाठी समित्या तयार केल्या आहेत. शिक्षक आणि अभ्यास मंडळ सुटाकडेच ठेवण्यासाठी चुरशीचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच आजी-माजी कृती समितीच्या मार्गदर्शनाखाली समविचारी संघटनांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. परंतू विकास आघाडीने एखादी जागा

**विविध अधिकार मंडळाच्या जागा**

| | |
|---|---|
| अधिसभा | ३९ |
| विद्या परिषद | ८ |
| प्रत्येक अभ्यास मंडळ | ३ सदस्य |
| प्राचार्य | १० |
| शिक्षक | १० |
| संस्था संचालक | ६ |
| विद्यापीठ अधिविभाग शिक्षक | ३ |
| नोंदणीकृत पदवीधर | १० |
| विद्या परिषद प्रत्येक विभागातून | २ |



**मतदार संघानुसार अंतिम मतदार यादी**

| | |
|---|---|
| शिक्षक मतदार संघ | २९४५ |
| बि. ओ. एस. महाविद्यालय विभागप्रमुख | ९३७ |
| प्राचार्य मतदार संघ | ९३ |
| व्यवस्थापक सदस्य, संस्थाचालक मतदार संघ | ११६ |
| विद्यापीठ शिक्षक | १६६ |
| पदवीधर | ३६३४३ |

दिली तर बरोबर जाण्याची तयार ठेवली असून, वरिष्ठांशी बोलणी सुरू असल्याचे समजते. शिव-शाहू आघाडीने युवा सेना कोअर कमिटीचे सदस्य पवन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पदवीधरची निवडणूक लढवण्यासाठी कंबर कसलीय. अपक्ष उमेदवारांनी स्वतंत्रपणे प्रचाराला सुरुवात केली आहे.

तरूण भारत

# विद्यापीठ निवडणूक उमेदवारी अर्जांची आज छानननी

## मंगळवारी अर्ज माघारीचा अंतिम दिवस

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ निवडणूक प्रचाराची कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यात रणधुमाळी सुरू आहे. ३९ जागांसाठी २९० उमेदवारी अर्ज भरले असून सोमवार, ३१ ऑक्टोबरला उमेदवारी अर्जांची छाननी होणार आहे. तर मंगळवार १ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज माघार घेण्यासाठी अंतिम मुदत आहे. विद्यापीठ प्रशासनाने निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी जय्यत तयारी केली आहे.

विद्यापीठ निवडणुकीतील अर्ज माघारीनंतरचा टप्पा म्हणजे २ नोव्हेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्जांच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे तक्रार करावयाची आहे. ३ नोव्हेंबर रोजी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द होईल. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार असून निकाल जाहीर होईल. विद्यापीठ पातळीवर निवडणूक विभागाने निवडणूक सुरळीत पार पडावी म्हणून जय्यत तयारी केली आहे. विविध समित्या स्थापन करून प्रत्येक समितीला निवडणुकीचे काम वाटून देण्याची प्रक्रिया सुरू आहे. तर दुसरीकडे संस्थापक, प्राचार्य, शिक्षक, पदवीधर सर्वच घटक निवडणुकीच्या प्रचारात व्यस्त आहेत. यंदा विद्यापीठ विकास आघाडी, सुटा, शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी परिषद, शिव-शाहू आघाडीसह अपक्ष उमेदवारी अर्ज भरणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे विद्यापीठाची अधिसभेची निवडणूक बहुरंगी होण्याची शक्यता आहे. तरीही अर्ज माघारीनंतरच निवडणुकीचे खरे चित्र स्पष्ट होईल.